# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 13 August 2024
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक – १३ ऑगस्ट २०२४ सायंकाळी ६.१०

****

- नैसर्गिक आपत्ती प्रतिबंधासाठी दोन हजार ७६६ कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी
- विदर्भासह मराठवाड्यात दुग्धविकास प्रकल्पाचा दुसरा टप्पा राबवण्याचा राज्य शासनाचा निर्णय
- जुन्या पेन्शनच्या मागणीसाठी राज्य सरकारी अधिकारी–कर्मचाऱ्यांचा संपाचा इशारा

आणि

- सांस्कृतिक कार्य विभागाच्या पुरस्कारांची घोषणा–ज्येष्ठ गायिका अनुराधा पौडवाल यांना गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार जाहीर

****

नैसर्गिक आपत्ती प्रतिबंधासाठी दोन हजार ७६६ कोटी रुपयांच्या सुमारे दोन हजार कामांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंजुरी दिली आहे. आज झालेल्या राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी ही माहिती दिली. यात दरड प्रतिबंधक, पूर संरक्षण भिंत, लहान पुलांची उभारणी, नाला खोलीकरण, भूजल पुनर्भरण, तलाव दुरुस्ती, वनीकरण आदी कामांचा समावेश आहे. या कामात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. मंत्रालयातल्या तसंच प्रत्येक जिल्ह्यातल्या आपत्ती प्रतिसाद केंद्राचे अद्ययावतीकरण करण्यात येणार असून त्यासाठी १०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देणार असल्याचं शिंदे यांनी सांगितलं. यावेळी आपत्ती विषयक विविध आराखड्यांना मंजुरी देण्यात आली.

****

पशुपालन आणि दुग्धव्यवसायाला चालना देण्यासाठी विदर्भ आणि मराठवाड्यातल्या सर्व १९ जिल्ह्यात दुग्ध विकास प्रकल्पाचा दुसरा टप्पा राबवण्याचा निर्णय राज्य शासनानं घेतला आहे. आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या प्रकल्पासाठी १४९ कोटी २६ लाख रुपयांच्या निधीला मान्यता देण्यात आल्याची माहिती पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ आणि मदर डेअरी यांच्या सहकार्याने हा प्रकल्प राबवला जाणार आहे.

****

यंत्रमागांना अतिरिक्त वीजदर सवलतीसाठी नोंदणीची अट शिथील करण्याचा निर्णय आज मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. २७ ते २०१ अश्वशक्ती भाराच्या यंत्रमागांना प्रती युनिट ७५ पैसे तसंच २७ अश्वशक्तीपेक्षा कमी भाराच्या यंत्रमागांना प्रती युनिट १ रुपया अतिरिक्त वीज दर सवलत लागू करताना असलेली नोंदणीची अट शिथिल करण्यात येणार आहे.

राज्यात सहा हजार किलोमीटर लांबीच्या रस्त्यांच्या काँक्रीटीकरणासाठी ३६ हजार ९६४ कोटी खर्चास या बैठकीत मान्यता देण्यात आली. शासकीय तसंच खासगी वैद्यकीय महाविद्यालयाच्या निवृत्त प्राध्यापकांना ठोक मानधन देण्याचा निर्णय आजच्या बैठकीत घेण्यात आला.

****

राज्यातील ३९० मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पांच्या कर्जासाठी केएफ डब्ल्यू कंपनीशी स्थिर व्याजदराने करार करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला आहे. यासाठी एक हजार ४९४ कोटी ४६ लाख रूपये किंमतीच्या खर्चास मान्यता देण्यात आली. हे प्रकल्प यवतमाळ, वाशिम आणि चंद्रपूर जिल्ह्यात उभारण्यात येणार आहेत.

****

देशात पहिलं आंतरराष्ट्रीय दर्जाचं ‘अहिल्या भवन’ मुंबईत मानखुर्द इथं उभारणार असल्याची घोषणा जिल्ह्याचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा यांनी केली आहे. ३५ हजार ५०० चौरस मीटर परिसरात हे भवन उभारलं आहे. यामध्ये महिला आणि बालहक्क आयोग, बालकल्याण समिती, बाल न्याय मंडळ, महिला आर्थिक विकास महामंडळ आदी २० कार्यालयं असणार आहेत.

****

कोलकत्यातील डॉक्टर महिलेवर झालेल्या अत्याचार आणि हत्येच्या घटनेच्या निषेधार्थ निवासी डॉक्टरांचा देशव्यापी संप सुरू आहे. मुंबईतल्या विविध रुग्णालयांतील निवासी डॉक्टरांनीही आंदोलन सुरू केलं आहे. दरम्यान, राष्ट्रीय मानवाधिकार आयोगानं पश्चिम बंगालचे मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालकांना या प्रकरणी नोटीस बजावत दोन आठवड्यांत अहवाल सादर करण्यास सांगितलं आहे.

दरम्यान, छत्रपती संभाजीनगर इथं शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातील निवासी डॉक्टरांनी काल रात्री मेणबत्ती मोर्चा काढून निषेध नोंदवला. आज आपत्कालीन सेवा वगळता घाटीतले निवासी डॉक्टरही संपात सहभागी झाले होते.

****

मराठा आरक्षण आंदोलन कर्ते मनोज जरांगे पाटील यांची आज नाशिकमध्ये शांतता रॅली झाली. यावेळी केलेल्या भाषणात जरांगे यांनी राज्याचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्यावर कडाडून त्यांनी टीका केली.

****

राज्यातील सरकारी अधिकारी आणि कर्मचारी येत्या २९ तारखेपासून बेमुदत संपावर जाणार आहेत. जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी नेमलेल्या समितीचा अहवाल स्वीकारून ही सरकार त्यावर अंतिम निर्णय घेत नसल्याच्या निषेधार्थ हे आंदोलन पुकारत असल्याचं राजपत्रित अधिकारी महासंघाकडून सांगण्यात आलं आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना एक निवेदनही सादर करण्यात आलं आहे.

****

देशाचा ७८ वा स्वातंत्र्य दिन परवा साजरा होत आहे. यानिमित्तानं नवी दिल्ली इथं मुख्य सोहळ्यात सहभागी होण्यासाठी जालना जिल्ह्याच्या बदनापूर तालुक्यातल्या ढासला ग्रामपंचायतीचे सरपंच राम पाटील आणि त्यांच्या पत्नी वर्षाराणी पाटील यांना, तसंच परतूर तालुक्यातील रमेश भापकर आणि त्यांच्या पत्नी पूजा भापकर या दाम्पत्यांना निमंत्रण मिळालं आहे. राम पाटील यांनी आपल्या भावना या शब्दांत व्यक्त केल्या –

> ***मला जवळपास १४ वर्ष याठिकाणी होत आहेत, मी तिथं जास्तीत जास्त शासनाच्या योजना असतील, वैयक्तिक लाभाच्या योजना असतील, सार्वजनिक लाभाच्या योजना असतील, प्रत्येक योजनेचा***

***लाभ दिला. किंवा प्रत्येक लाभ घेण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे माझ्या कामाची दखल घेत माझी याठिकाणी निवड करण्यात आली.***

****

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत यावर्षीच्या इयत्ता दहावी आणि बारावी परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना खासगीरित्या प्रवेश घेण्यासाठी आजपासून ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी ३० सप्टेंबरपर्यंत नावनोंदणी करून आवश्यक कागदपत्रांच्या प्रती नमूद केलेल्या शाळेत, कनिष्ठ महाविद्यालयात जमा कराव्या असं मंडळानं प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळवलं आहे.

****

राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत देण्यात येणाऱ्या या वर्षीच्या विविध पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. ज्येष्ठ गायिका अनुराधा पौडवाल यांना गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार जाहीर झाला आहे. आरती अंकलीकर-टिकेकर यांना भारतरत्न पंडीत भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवन गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. प्रकाश बुध्दीसागर यांना, नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार, शुभदा दादरकर यांना, संगीताचार्य अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार, संजय महाराज पाचपोर यांना ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार, शशिकला झुंबर सुक्रे तसंच जनार्दन वायदंडे यांना तमाशासम्राज्ञी विठाबाई नारायणगांवकर जीवनगौरव पुरस्कार यासह विविध १२ गटांत सांस्कृतिक पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. यंदा जीवनगौरव पुरस्कारांची रक्कम दुप्पट करण्यात आली असून त्याचं स्वरूप दहा लाख रुपये सन्मानचिन्ह आणि मानपत्र असं आहे. राज्य सांस्कृतिक पुरस्काराची रक्कम तिप्पट करण्यात आली असून, आता या पुरस्काराचं स्वरूप तीन लाख रुपये, मानपत्र आणि मानचिन्ह असं आहे.

****

हर घर तिरंगा अभियानांतर्गत आज लातूर इथं जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयावर ध्वज फडकावून या उपक्रमाला सुरुवात झाली. जिल्ह्यातल्या शासकीय, निमशासकीय कार्यालयांवर आज तिरंगा ध्वज फडकवण्यात आला.

हिंगोली इथं नगर परिषदेचे मुख्यधिकारी अरविंद मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत 'तिरंगा यात्रा' काढण्यात आली. विविध कार्यालयातले अधिकारी–कर्मचारी या रॅलीत सहभागी झाले. यावेळी विद्यार्थ्यांना तिरंगा ध्वजाचं वितरणही करण्यात आलं.

****

या मोहिमेत धाराशिव जिल्ह्यात ग्रामीण भागात ८० हजार तर शहरी भागात एक लाख तिरंगा ध्वज वितरित केले जाणार आहेत. यासाठी कनगरा इथल्या महाराष्ट्र जीवनोन्नती अभियान अर्थात उमेद अभियानाशी संलग्नित एनपीके महिला बचत गटाच्या माध्यमातून तिरंगा ध्वजाची निर्मिती करण्यात येत आहे. या महिला बचत गटाला जिल्हा प्रशासनाने ८० हजार ध्वज निर्मितीचं उद्दिष्ट दिलं असून, जवळपास १०० महिलांना तिरंगा ध्वज निर्मितीचं काम मिळालं आहे. या महिलांनी आपल्या भावना या शब्दांत व्यक्त केल्या –

***लक्ष्मी बनसोडे***

***गेल्या तीन वर्षापासून आम्ही ध्वज निर्मितीचं काम करतो. सात रूपये प्रमाणे आम्ही एक ध्वज तयार करतो. आणि आम्हाला दिवसाचे चारशे ते पाचशे रूपये रोजगार मिळतो. म्हणजे चांगलाच हातभार आमच्या संसाराला लागतो.***

***नाझिया शेख***

***आमच्या उत्पादक गटामध्ये सध्या तिरंगा ध्वजची निर्मिती होत आहे. या वर्षी आमच्या एन पी के गटाला ५० हजारांची ऑर्डर धाराशिव जिल्ह्यासाठी मिळालेली आहे. त्या ऑर्डरमध्ये आम्हाला तीन ते साडेतीन लाखाचा निव्वळ नफा मिळण्याची शक्यता आहे. त्यात काम करतांना आम्ही पण देशासाठी काम करत आहोत याचा आम्हाला खूप अभिमान आहे. यासाठी आमच्या गटातील महिला खूप खूश आहेत आणि आमचं खूप उत्साहात तिरंगा ध्वज निर्मितीचं काम चालू आहे.***

****

माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचा १२ वा स्मृतीदिन उद्या पाळण्यात येत आहे. यानिमित्तानं लातूर मेडिकल असोसिएशन, डेंटल असोसिएशन, निमा असोसिएशन, होमिओपॅथी असोसिएशन तसेच विलासराव देशमुख फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने महाआरोग्य शिबिराचं आयोजन करण्यात आलं आहे. जवळपास ३०० रुग्णालयांच्या माध्यमातून हे महाआरोग्य शिबीर पार पडणार असल्याचं, आज एका पत्रकार परिषदेत सांगण्यात आलं.

****

परभणी शहरापासून जवळच असलेल्या सुकापुर वाडी गावाला रस्ता नसल्यानं इथल्या नागरिकांनी आज जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी रश्मी खांडेकर यांच्या दालनात विद्यार्थ्यांसह शाळा भरवली. मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत इथून हलणार नसल्याचा पवित्रा या सर्वांनी घेतल्यानं, काही काळ गोंधळ निर्माण झाल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

जालना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकानं ५० लाख ८२ हजार रुपये किमतीचा गुटख्यासह एकूण ७० लाख ८२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. बीडहून निघालेला हा ट्रक जालना-अंबड मार्गावरील लालवाडी शिवारातून जालन्याकडे येत असताना पोलिसांनी ही कारवाई करत, ट्रक चालकाविरुध्द गुन्हा दाखल केला.

****